**क्रमांक.क्रा.4/प्र.क्र.2681/भाग-2/दस्तलेखनिक/4015-4380**

**नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक.**

**महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालय, पुणे 1**

**दि- 26/09/1997**

**वि**षय - राज्यातील दस्तलेखनिकांचे लिहिणावेळीची दर निश्चित करणेबाबत.

## आदेश

दस्तलेखकांना दस्तऐवज लिहिण्यासाठी परवाने देणे व दस्तऐवज लिहिण्यावेळेचे दर निश्चित करणे आणि दस्तलेखनावर नियंत्रण् ठेवणे इत्यादी सर्वानी जबाबदारी नियमानुसार जिल्हा निबंधक यांचेवर आहे.तथापि जनहिताच्या दृष्टीने राज्यातील सर्वच जिल्हांत दस्तऐवज लिहिणेवेथळेची दरात एकसुत्रीपणा राहून जनतेस दस्तलेखकाविरुद्ध् तक्रारी करण्यास वाव मिळू नये.यासाठी प्रशासकीय कारणास्तव खालील प्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

राज्यातील सर्व दस्तलेखकांनासाठी दि.1/10/1997 पासून दस्त ऐवज, प्रतिज्ञापत्रे, मुखत्यारपत्रे, नक्कल अर्ज व विवाह विज्ञाप्ती लिहिणावेळीची दर खालील प्रमाणे दर निश्चित येत आहेत.

**लेखनाचा प्रकार -** **दर**

1) सर्व प्रकारच्या दस्तऐवजासाठी ( पुस्तक क्र 1,3 व 4चे संबंधीत सर्व दस्त ऐवज).

दस्ताच्या प्रत्येक पानास ................ रु.(5/-) पाच रु. मात्र

जास्तीतजास्त ................... रु.(100/-) शंभर रु. मात्र

(प्रत्येक पानावर कमीतकमी 100 शब्द असावेत).

2) प्रतिज्ञापत्रे रु.(10/-) दहा मात्र

..................................................................................................................................

3) मुखत्यापत्रे

अ) विशेष मुखत्यापत्रे रु.(10/-) दहा मात्र

(दस्त नोंदणीसाठी)

ब) सर्वसाधारण मुखत्यापत्रे रु.(25/-) पंचवीस मात्र

4) नक्कल अर्ज -

सुची क्रमांक 2 अथवा दस्ताचा प्रमाणित नकलेसाठी. रु.(3/-) तीन मात्र

..................................................................................................................................

5)इतर अर्ज -

(क्र 4 मधील वगळून) रु.(5/-) पाच मात्र

..................................................................................................................................

6) (विवाह विज्ञाप्ती) रु.(5/-) पाच मात्र

..................................................................................................................................

दस्त लेखनिकाने वसूल केलेल्या लिहिणावळीच्या रकमेची पावती पक्षकारास न चुकता दयावी.

का.प्र.नों.म.नि.

यांचे सहीच्या असे----

**नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक.**

**महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालय, पुणे**

**प्रत-**

**1)** सचिव महसूल व वन विभाग (म-1) मंत्रालय,मुंबई यांना माहितीसाठी सादर.

**2)** सर्व नोंदणी उपमहानिरीक्षक व मुद्रांक उपनियंत्रक यांना माहितीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी.

3) दुय्यम निबंधक तथा प्रशासकीय अधिकारी,मुंबई/बांद्रा यांना माहीतीसाठी अग्रेषीत.

**4)** सर्व सह जिल्हा निबधक(दुय्यम निबंधक यांचे प्रतिसह ) यांना माहीतीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी .

5) सर्व कार्यासन अधिकारी, नोंदणी महानिरीक्षक कार्यालय,पुणे.